ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**
*January - June 2021- Vol. 10 No. 1*

# अतिरिक्त लोकसंख्या–भारताची समस्या

**प्रा.डॉ. आव्हाड भगवान भानुदास**
समाजशास्त्र विभाग
आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा. ता. आष्टी

★★★

**गोषवारा**–सध्याच्या जागतिक लोकसंख्येत विकसनशील देशांची लोकसंख्या साधारणत ८० टक्के आहे. विकसनशील देशांचा लोकसंख्या वाढीचा वेग सरासरी १.५ टक्के आहे, तर विकसित देशांचा फक्त ०. ५ टक्के आहे. विकसनशील देशांच्या लोकसंख्येच्या जडणघडणीत भारताचा मोठा वाटा आहे. जगाच्या लोकसंख्येने आतापर्यंत सातशे नव्वद कोटींचा पल्ला ओलांडला आहे. जगाच्या लोकसंख्यावाढीचा आधीचा वेग अतिशय कमी होता, म्हणजे सन १८०४ मध्ये जगाची लोकसंख्या शंभर कोटी होती, ती २०० कोटी होण्यास १२३ वर्षांचा कालावधी जावा लागला. त्यानंतर २०० कोटी लोकसंख्येचे ३०० कोटी होण्यास फक्त ३३ वर्षे लागली आणि नंतर ३०० कोटींची ४०० कोटी लोकसंख्या फक्त १४ वर्षांत झाली. देशांच्या 'जलद विकासासाठी' लोकसंख्या महत्वाचा घटक आहे पण भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशाचा विचार केला तर वाढती लोकसंख्या विकसनशील देशांच्या सामाजिक विकासाच्या स्त्रोतांवर अडथळा बनते. भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील दुसर्याम क्रमांकाचा देश आहे. हा लेख वाढत्या लोकसंख्येचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या समस्येवर प्रकाश टाकतो तसेच जन्मदर, मृत्यूचे प्रमाण आणि मृत्यू दर कमी होण्याच्या घटकांचे विश्लेषण केले आहे. मुख्य शब्द रू लोकसंख्या वाढ, दारिद्र्य, जन्म दर आणि मृत्यू दर प्रमाण, लोकसंख्या वाढीचे कारणे

**परिचय**– मनुष्य सर्व संपत्तीचा निर्माता आहे आणि मनुष्याशिवाय इतर सर्व साधने काहीच उपयोगाची नाहीत. म्हणून मनुष्य हा सर्व विकास प्रयत्नांचा केंद्रबिंदू आहे. समग्र मानवजातीच्या वापरासाठी संपत्ती निर्माण केली जाते. देशाची लोकसंख्या ही सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे. पाष्चात्य देशांच्या 'लवकर विकासामध्ये लोकसंख्या हा सर्वात महत्वाचा हातभार लावणारा घटक होता. वाढत्या लोकसंख्येमुळे कामासाठी अतिरिक्त हात आणि नव्याने तयार केलेला माल खरेदी करण्यासाठी अतिरिक्त पैसा मिळत गेला. तथापि, भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशाच्या विकासात अडथळा बनते, विशेषत अविकसित देशांच्या बाबतीत अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या जीवनाला उदासीन करते. त्यामुळे बेरोजगारांच्या वाढत्या प्रवाहात भर घालत आहे. म्हणूनच लोकसंख्यावाढीचा दर नियंत्रित ठेऊन सामाजिक विकास करण्यासाठी लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या रू लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगात सध्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिला क्रमांक अर्थातच चीनचा आहे. सध्याच्या भारतीय लोकसंख्यावाढीचे प्रमाण लक्षात घेता सन २०५० पर्यंत भारत चीनला मागे टाकून प्रथम क्रमांकावर येऊ शकेल. सध्याच्या जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा १६ टक्के आहेय परंतु जगाच्या भूभागांपैकी फक्त २.४ टक्के भूभाग भारताने व्यापला आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न एकूण जागतिक उत्पन्नाच्या केवळ दोन टक्के आहे. हे स्पष्टपणे सामाजिक व्यवस्थेवरील प्रचंड ताण दर्शवते, दरवर्षी भारतीय लोकसंख्येत सुमारे १.८ कोटींची भर पडते. या वेगाने सन २०५० पर्यंत भारतीय लोकसंख्या १५३ कोटींवर पोहोचेल, तेव्हा भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असेल. लोकसंख्या जनगणना २०११ –२०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार २०११ मध्ये भारताची एकूण लोकसंख्या १२१.० कोटी होती तर २००१ मध्ये १०२.८ कोटी लोक होते.

**तक्ता – १ भारतात लोकसंख्या वाढ १६०१–२०११**

| वर्ष | भारताची लोकसंख्या (कोटी मध्ये) | मागील दशकात वाढ किंवा घट (कोटी मध्ये) | मागील दशकात टक्केवारी वाढ किंवा घट (कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| १६०१ | २३. ६१ | ––– | |
| २००१ | १०२.८० | १८.१७ | २१.४६ |
| २०११ | १२१.०२ | १८.२२ | १७.७२ |
| १६११ | २५.२१ | १.६० | ६.७७ |
| १६२१ | २५.१३ | –०.०८ | –०.३ |
| १६३१ | २७.६१ | २.७८ | ११.०६ |
| १६४१ | ३१.८७ | ३.६६ | १४.१८ |
| १६५१ | ३६.११ | ४.२४ | १३.३ |
| १६६१ | ४३.६२ | ७.८१ | २१.६२ |

**तक्ता दृ १** प्रस्तुत तक्ता १९५१–२०११ या साठ वर्षांच्या कालावधीमध्ील लोकसंख्या वाढ दर्शवतो. भारताची लोकसंख्या ८४.९ कोटीने वाढली आहे. २००१–२०११ च्या फक्त एका दशकात १८.२२ कोटी लोकसंख्येची वाढ नोंदली गेली होती जी या दशकातील १७.७२ टक्के वाढीचा दर दर्शवते तर १९९१–२००१ या काळात २१.४६ टक्के वाढ झाली होती. लोकसंख्या अनियमित वाढीचा कालावधी (१९०१–२०२१ ) रू वरील तक्ता –१ मधून असे दिसून आले आहे की लोकसंख्या वाढीचे प्रमाण २०२१ पर्यंत मध्यम व अनियमित होते. १९०१ ते १९२१ दरम्यान भारताची लोकसंख्या १.६ कोटीने वाढली. दोन दशकांच्या संपूर्ण कालावधीसाठी ०.२ टक्क्यांपेक्षा कमी दर. या छोट्या आणि अनियमित वाढीमागील मुख्य कारण म्हणजे दुष्काळ आणि वारंवार साथीच्या रोगांनी मानवी जीवन धोक्यात आले होते. १९१८–१९१९ च्या दरम्यान शीतज्वर या रोगाने २.० कोटी लोकांना आपले प्राण गमवावे लागले. लोकसंख्या वेगवान वाढीचा कालावधी जनगणना आयोगाने सन १९२१ चे 'महान विभाजन' म्हणून वर्णन केले कारण तेव्हापासून वाढीचा दर सातत्याने वाढत राहील व आता तो चिंताजनक झाला आहे. १९२१ ते १९५१ या काळात वर्शात लोकसंख्येची निव्वळ वाढ १०.९८ कोटी इतकी होती. पुढील चार दशकांत म्हणजेच १९५१–१९९१ मध्ये आणखी ४८.५२ कोटी लोकांना भारताच्या लोकसंख्येमध्ये जोडले गेले. १९२१ पासून भारतातील लोकसंख्येतील ही भन्नाट वाढ ही मुख्यत साथीच्या आजारात आणि दुष्काळांतून झालेल्या "असामान्य मृत्यू" आणि इतर मृत्यूचे प्रमाण यामध्ये झालेली घट यामुळे झाली. भारतातील लोकसंख्या वाढीची क्षमता दोन कारकांमुळे उच्च आहे. प्रथम पायाभूत लोकसंख्या मोठी आणि दुसरी, जन्म दरात अनुरुप घट झाल्याशिवाय लोकसंखेच्या दरात घाट होणे अत्यंत अशक्य आहे.

**तक्ता–2 भारतात सरासरी वार्षिक जन्म दर आणि मृत्यू दर**

| वर्ष | जन्म दर | मृत्यू दर | भारतात सरासरी वार्षिक जन्मदर |
|---|---|---|---|
| १९०१–१९११ | ४९.२ | ४२.६ | ६.६ |
| १९११–१९२१ | ४८.१ | ४८.६ | –०.५ |
| १९२१–१९३१ | ४६.४ | ३६.३ | १०.१ |
| १९३१–१९४१ | ४५.२ | ३१.२ | १४.० |
| १९४१–१९५१ | ३९.९ | २७.४ | १२.५ |
| १९५१–१९६१ | ४१.७ | २२.० | १९.७ |
| १९६१–१९७१ | ४१.२ | १९.० | २२.२ |
| १९७१–१९८१ | ३७.२ | १५.७ | २१.५ |
| १९८१–१९९१ | ३३.९ | १२.६ | २१.३ |
| १९९१–२००१ | २५.८ | ८.५ | १७.३ |
| २००१–२०११ | २२.१ | ७.२ | १४.९ |
| २०११–२१. | ४७. | ०१ | ४.४ |

तक्ता दृ २ असे दिसते की १९५१–१९६१ मध्ये भारतातील वार्षिक जन्म व मष्त्यू दर प्रति हजार ४१.७ आणि २२.० होता. परिणामी लोकसंख्येत १९.७ः लोकांची वाढ झाली. १९६१–७१ दरम्यान, जन्मदर प्रति हजारात ४१.२ वर कायम राहिला तर मष्त्यूदर घटून तो १९.० प्रति हजार झाला, ज्यामुळे लोकसंख्येमध्ये २२.२ः वाढ झाली. त्याचप्रमाणे २००१ ते २०११ या दशकात जन्म दर आणि मृत्यूच्या दरात आणखी घट झाली. जन्म दर दर हजारांवर २२.१ पर्यंत खाली आला असताना मृत्यू दर किरकोळ घटून दर ७.२ वर आला. यामुळे लोकसंख्येच्या वाढीच्या दरामध्ये तुलनेने थोडीशी वाढ झालीय राष्ट्रीय लोकसंख्यावाढीचा दर हा दर हजारी १४.९ आहे जो मागील दशकात १७.३ प्रति हजार होता. २००१–११ च्या दशकात भारताच्या लोकसंख्येमध्ये सुमारे १८.१ कोटी लोकांची भर पडली तथापि जन्मदर कमी करणे ही मूलभूत सामाजिक समायोजना अंमलात आणणे अत्यावश्यक आहे.

लोकसंख्या वाढण्याचे कारणेः भारतातील लोकसंख्या वाढीचा तीव्र परिणाम म्हणजे जन्माचा उच्च दर आणि आपल्या देशात मृत्यू दरात मोठ्या प्रमाणात घट. अशा प्रकारे उच्च जन्म दर कोणत्या घटकांचे आणि मृत्यूच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात घट होण्यास कारणीभूत असलेल्या घटकांचे विष्लेशण केले पाहिजे.

**१. जन्म–मृत्युदर** – आपल्या देशात मृत्युदरात घट झालेली आढळून येते. परंतु जन्मदर मात्र त्या मानाने घटलेला नाही. आपल्या देशाचा १००० लोकांमध्ये जन्मदर १८.२ आहे व मृत्युदर ७.३ आहे. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होते.

**२. बालविवाह**– आजही अनेक मूला–मुलींचा विवाह कायद्याने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे होत नाहीत. विवाह झाल्यावर लवकर मुले होतात. त्यावर नियंत्रण करण्यासाठीच्या माहितीचा अभाव व अज्ञान असते. या वयामध्ये महिला कोणत्याही गोष्टींचे निर्णय कुटुंबामध्ये घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे वयाच्या ४५ वर्शापर्यंत ती गर्भधारणा करू शकते. त्यामुळे अनेक अपत्य जन्माला येतात. हे देखील लोकसंख्या वाढीमध्ये भर घालणारे घटक आहेत.

**३. मुलगा वंशाचा दिवा** – समाजामध्ये काही अंधश्रद्धा असतात. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, मेल्यावर पाणी पाजण्यास, अग्नी देण्यास, संपत्तीला वारस मुलगाच पाहिजे, त्यामुळे मुलाची वाट पाहत कुटुंबात माणसे वाढतात. मुलगी ही परक्याचे धन समजले जाते त्यामुळे मुलगा होईपर्यंत कुटुंब नियोजन केले जात नाही. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होताना दिसून येते.

**४. मुले ही ईश्वरी देणगी आहे** – आजही काही समाजामध्ये कुटुंब नियोजन करणे पाप मानले जाते. मुले ही ईश्वरीय देणगी समजले जाते. या अंधश्रद्धेपोटी लोकसंख्या वाढ होताना आढळून येते.

**५. बाल मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण** – ग्रामीण भागांमध्ये बालमृत्यूचे व अर्भक मृत्यूचे प्रमाण जास्त असल्यामुळे अनेक मुलांना जन्म दिला जातो. त्यामुळेही लोकसंख्येमध्ये वाढ होते.

**६. निरक्षरता** – आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

निरक्षरतेमुळे अंधश्रद्धा वाढतात. लोकसंख्या वाढली तर माणसाला अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. शिवाय शासनालासुद्धा आरोग्य सुविधा व इतर सुविधा पुरविणे अवघड होते. तेव्हा ही लोकसंख्यावाढ थांबविण्यासाठी विविध स्तरावर अनेक प्रयत्न चालू आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्री पुरुषामध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. लोकसंख्यावाढीमुळे अनेक अडचणी उभ्या राहतात. त्या संबंधीची जाणीव लोकांमध्ये निर्माण करायला हवी.

**७. दारिद्रय गावोगावी जनतेचे दारिर्द हे आणखी एक कारण आहे.** कारण जितकी कुटुंबातील व्यक्तीची संख्या तितके काम करणारे हात अशी त्यांची धारणा असते.

**मृत्यूचे प्रमाण कमी होण्याचे मुख्य कारणे आहेतः**

**१.** व्यापक आणि सुधारित वैद्यकीय आणि आरोग्य सुविधा.

**२.** वाहतूक व दळणवळणाच्या माध्यमांच्या विकासामुळे भारतात दुष्काळावर नियंत्रण.

**३.** मलेरिया आणि टीबीसारख्या भयानक रोगांवर नियंत्रण आणि देवीरोग, कांजन्या इत्यादी रोगांचे पूर्णपणे निर्मूलन केले गेले आहे.

४. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात स्वच्छतेमध्ये सुधारणा आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. सर्वसामान्यांच्या एकूणच आर्थिक परिस्थितीत होणाऱ्या सुधारणांमुळे मृत्यूदरात घट झाली आहे. वरच्या चर्चेतून हे स्पश्ट होते की सतत वाढलेला जन्म दर आणि मृत्यू दरात तीव्र घट यामुळे भारत सध्या 'लोकसंख्या स्फोट' या कालखंडातून जात आहे.

लोकसंख्या संक्रमानचा सिद्धांत हा सिद्धांत एखाद्या देशाच्या लोकसंख्येच्या आकार आणि वाढ दरावर आर्थिक विकासाच्या परिणामाचे स्पष्टीकरण देतो. सिद्धांत आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यांवरील लोकसंख्या वाढीच्या दराचा संदर्भ देतो. या सिद्धांतानुसार, अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसह लोकसंख्या वाढीचे तीन वेगळे चरण आहेत जे बदलत्या सामाजिक–आर्थिक परिस्थितीनुसार जन्म दर आणि मृत्यूच्या दरात बदल झाल्यामुळे होते.

१. उच्च जन्म दर आणि तितकाच उच्च मृत्यू दर ज्यामुळे लोकसंख्येचा वेग स्थिर राहतो.

२. उच्च जन्म दर आणि वेगाने घसरत जाणारा मृत्यू दर ज्यामुळे लोकसंख्या स्फोट होते.

३. कमी जन्म दर आणि सामान्य मृत्यू दर लोकसंख्या वाढीचा दर कमी करते.

अतिरिक्त लोकसंख्या – भारताच्या सामाजिक विकासासाठी एक अडथळा वर्तमान स्थितीचा आढावा घेतला असता २०२१ मध्ये भारताची लोकसंख्या १३५ कोटी पेक्षा जास्त आहे. याचा अर्थ असा आहे की जगातील एकूण २.४ टक्के क्षेत्रावर जगातील जवळजवळ १७ टक्के लोक भारतात राहतात. आणि आपल्या संसाधनांचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी देशाकडे भांडवल आणि तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने बहुतेक भारतीय गरिबीत जीवन जगतात, बेरोजगाराला तोंड देतात आणि आरोग्य समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यामुळे भारतातील जवळजवळ २० टक्के लोक आजही अनेक सुविधा पासून वंचित आहेत. आजच्या अविकसित तसेच विकसनशील देशांमध्ये वाढती लोकसंख्या सामाजिक विकासाला अडथळा ठरते. समाजाचा विकास करण्याचे ध्येय साध्य करत असतांना लोकसंख्या वाढीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे हे आता सर्वत्र मान्य आहे.

**लोकसंख्येच्या वाढीने निर्माण झालेल्या समस्या**

१. वाढत्या लोकसंख्येमुळे अतिरिक्त उत्पन्नाचा बराचसा भाग खाऊन टाकला आहे. त्यामुळे सामाजिक जीवनाचा दर्जा घसरला आहे.

२. भारतात लोकसंख्येच्या स्फोटांमुळे देशात अनेक समस्यांनी उग्ररुप धारण केले आहे, म्हणतात ना 'वाढती लोकसंख्या अनेक समस्यांची जननी' याचा प्रत्यय आज येत आहे. साठ टक्क्यांहून अधिक व्यक्ति शेती तसेच शेतीपूरक प्राथमिक व्यवसायात गुंतले आहेत. तरी अनेक भारतीय व्यक्तींना पुरेसे अन्नही मिळत नाही.

३. सतत वाढणारा जन्म दर देशाच्या अनुत्पादक लोकसंख्येत अधिक भर घालत आहे.

४. लोकसंख्येच्या वाढीमुळे बेरोजगारांची संख्या वाढली असून त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

५. लोकसंखेच्या प्रचंड वाढीमुळे सामाजिक विकासात बाधा निर्माण झाली आहे. त्यामुळे साहजिकच दरडोई उत्पन्न कमी झाले सर्वसामान्यांचे जीवनमान खालावले आहे.

**निष्कर्ष**– भारतात लोकसंख्या वाढीच्या वेगाने सामाजिक विकासास अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे लोकसंख्येच्या दारिद्रात वाढ झाली आहे. अतिरिक्त लोकसंख्या वाढ बेरोजगारीची परिस्थिती निर्माण करते, दरडोई उत्पन्न कमी करते आणि उत्पादक लोकांचे प्रमाण घटवते, भांडवल निर्मितीला खीळ बसते आणि लोकांना अकार्यक्षम बनवते. त्यामुळे समाजातील बहुसंख्य व्यक्तींचा सामाजिक दर्जा घसरला आहे. म्हणून कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या माध्यमातून जन्मदर कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत जेणेकरुन देशाच्या सामाजिक विकासासाठी असलेली संसाधने पुरेशी होतील. एवढेच नव्हे तर जलद लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारणही गरीबीच आहे. जर लोकसंख्या वाढीवर गरीबी हे मुख्य कारण ठरत असेल तर गरिबांना चांगले शिक्षण आणि चांगले जीवनमान कसे निर्माण करता येईल याकडे लक्ष्य केंद्रित करावे लागेल.

***संदर्भ***


1. *https://vishwakosh-marathi-gov-in*
2. *https://mr-vikaspedia-in*
3. *https://maharashtratimes-com*
4. *https://www-deshdoot-com*
5. *https://www-loksatta-com*
6. *https://yojana-gov-com*
7. *Mr-wikipedia-org*
8. *www-censusindia-gov-in*
9. *www-worldmeters-info*